सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:१६३(२)/२०१९/१४-ब दिनांक १२ जुलै, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ निकाल प्रक्रियेबाबत.**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०४/२०१९ व अधिसूचना क्रमांक १२/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक वन संरक्षक, गट-अ व वनक्षेत्रपाल,गट-ब या पदांच्या भरतीकरीता दि. १५ सप्टेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी जाहीर करण्यात येऊन दिनांक ४ ते २१ ऑगस्ट, २०२० या कालावधीमध्ये संबंधित उमेदवारांच्या मुलाखती देखील घेण्यात आल्या आहेत.

**२.** दरम्यान, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावर मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०२०/प्र. क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये शासनाकडून भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित करून संबंधित परीक्षेचा निकाल सुधारीत करणे क्रमप्राप्त ठरते.

**३.** प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित केल्यानंतर विषयांकित परीक्षेतून भरावयाच्या पदांचा सुधारीत तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| **सहायक वन संरक्षक, गट-अ (एकूण २९ पदे)** | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षण** | **खुला** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ४ | -- | -- | १ | १+१* | १ | २ | १+१* | ३ | १५ | १४ | २९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | -- | -- | १ | १ | १ | १ | १ | २ | १० | ९ | १९ |
| महिला | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | १ | ५ | ४ | ९ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |

| (२) वनक्षेत्रपाल, गट-ब (एकूण ७१ पदे) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षण** | **खुला** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ५+५* | ५ | १ | १* | ८ | २+१* | १०+४* | २ | ७ | ५१ | २० | ७१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खलीलप्रमाणे आहेः- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | १ | १ | ६ | २ | ८ | १ | ५ | ३२ | ९ | ४१ |
| महिला | ३ | २ | -- | -- | २ | १ | ४ | १ | २ | १५ | ६ | २१ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | २ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| वनशास्त्र पदवीधारक | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | २ | ४ |
| *अनुशेषाची पदे | | | | | | | | | | | | |

**४.** उपरोक्त पदसंख्येच्या आधारे महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ करीता निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.

ठिकाण- मुंबई

उपसचिव, परीक्षा-२
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.